# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४०२/२०२३ दिनांक – २२/११/२०२३

## ४८ वी कोकण परीक्षेत्रिय पोलीस क्रिडा स्पर्धामध्ये मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयातील ६९ खेळाडु सहभागी

सन २०२३ साली होणाऱ्या ४८ वी कोकण परीक्षेत्रिय पोलीस क्रिडा स्पर्धांचे आयोजक मा.पोलीस अधिक्षक रायगड हे करणार असुन सदरच्या स्पर्धा दि.२०/१०/२०२३ ते २५/११/२०२३ या कालावधित रायगड जिल्हयातील पोलीस मुख्यालय अलिबाग या ठिकाणी संपन्न होणार असुन सदर स्पर्धेकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील संघ मा.पोलीस महासंचलक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पुर्वपरवानगीने ठाणे ग्रामीण पोलीस संघासोबत खेळणार आहे.

सदर स्पर्धेकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील ०६ पोलीस अधिकारी व ६३ पोलीस अमंलदार खेळाडू असे एकुण ६९ खेळाडू सहभागी होणार आहेत.सहभागी खेळाडुमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेले देखील खेळाडु आहेत.

सहभागी खेळाडुमधील नयानगर पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरिक्षक तुषार माळोदे यांना ज्युदो खेळासाठी सन २०१० -२०११ महाराष्ट्र राज्य शासनाचा मानाचा शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार प्राप्त केला आहे.

पोलीस उपनिरीक्षक किशोर धायगुडे हे देखिल अखिलभारतीय हॉकी खेळाडू आहेत, पोलीस अमंलदार सचिन म्हस्के यांनी राज्य पातळीवर अनेक पदके प्राप्त केली असुन ते अखिल भारतीय कुस्ती खेळाडू आहेत.

पोलीस अमंलदार जावेद मुल्ला नवघर पोलीस ठाणे येथे कार्यरत असुन ते वुशु व बॉक्सींग या क्रिडा प्रकारात राष्ट्रीय खेळाडू असुन त्यांना अनेक पदके प्राप्त आहेत.

पोलीस मुख्यालय येथे कार्यरत असलेले पोलीस अमंलदार नामदेव ईस्वलकर कब्बडी खेळाचे उत्कृष्ट खेळाडु असुन त्यांनी सन २०१८ साली इंडो इंटरनॅशनल प्रो कब्बडी स्पधर्मध्ये चेन्नई चॅलेज या संघाकडुन खेळाताना संघास कांस्य पदक मिळवुन दिले आहे.

नयानगर पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेल्या महिला पोलीस अमंलदार रूचिता निंबर्ते यांनी सन २०१५ व २०१७ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस क्रिडा स्पर्धा मध्ये हॅंडबॉल या क्रिडा प्रकारात तृतीय क्रंमाक प्राप्त आहे.

दिनांक १९.११.२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय यांचे हस्ते खेळाडूंना क्रीडा कीट वाटप करण्यात आले. सदर कर्यक्रमात मा. पोलीस आयुक्त यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करुन खेळाडुंना शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमासाठी कार्यक्रमासाठी पोलीस उप आयुक्त गुन्हे व इतर वरिष्ठ अधिकारी सुध्दा उपस्थित होते.